पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक – १
विशेष सभा

दिनांक- **२९/ ०४ /२०१६** रोजी सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची विशेष सभा **शुक्रवार दिनांक २९/०४/२०१६ रोजी स.११.००** वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे **– सभापती**
२. मा.अजित दामोदर गव्हाणे
३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
४. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५. मा.आशा रविंद्र सुपे
६. मा.अनुराधा देविदास गोफणे
७. मा.जालिंदर (बाप्पू) शिंदे
८. मा.संजय निवृत्ती आहेर – स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.चंद्रकांत इंदलकर – क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जीवन गायकवाड – (कार्यकारी अभियंता स्थापत्य) मा.कैलास थोरात- (कार्यकारी अभियंता विद्युत), मा.प्रविण घोडे (कार्यकारी अभियंता विद्युत),मा.जयंत बरशेट्टी- (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा) मा.श्री.सतीश वाघमारे –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.संजय घुबे –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.शेलार ए.बी. (क.अभियंता जलनि:सारण) मा.श्री.टी.एच.दाते – सहा.आरोग्य अधिकारी, मा.श्री.पी.आर.तावरे – मुख्य आरोग्य निरीक्षक, मा.श्री. रोकडे सी.आर.- आरोग्य निरीक्षक, मा.श्री.एस.एच.वाघमारे - आरोग्य निरीक्षक

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

ठराव क्रमांक- ३ विषय क्रमांक- १

दिनांक- २९/४/२०१६

सूचक- मा.अजित गव्हाणे अनुमोदक- मा.सुरेखा गव्हाणे

**संदर्भ-** मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.इक्षे/०२/कावि/४०१/१६

दिनांक २५/०४/२०१६.

**विषय** – प्रभाग क्र. ३२ सॅण्डवीक कॉलनी व प्रभाग क्र. ३४ गव्हाणेवस्ती हगणदारी मुक्त घोषीत करणेसंबंधी विशेष क्षेत्रीय सभेचे आयोजन करणेबाबत.

केंद्रशासनाने देशातील सर्व शहरामधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळणे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणेचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/प्रक्र.२३/नवि/३४, दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दिष्ट निश्चीत केलेले आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/ ९६/ २०१६ दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पुर्वी टप्प्या टप्प्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने इ क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ३२ सॅण्डविक कॉलनी व प्रभाग क्र. ३४ गव्हाणे वस्ती हे दोन प्रभाग दि. ३०/४/२०१६ पूर्वी हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

**मा. सभापती-** यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे<br>
सभापती<br>
इ प्रभाग समिती<br>
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९<br>
क्र-इक्षेका/कावि/४/२१७/२०१६<br>
दिनांक- २९/४/२०१६

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)<br>
इ क्षेत्रीय कार्यालय<br>
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी<br>
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दिनांक २९/४/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे विशेष सभेत हगणदारी मुक्त प्रभाग याबाबत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.अजित गव्हाणे -** इ क्षेत्रीय कार्यालयाच्या सर्व प्रभागात इथून पुढे आपल्याला सर्वच ठिकाणी स्वच्छता करुन घ्यायची आहे.

**मा.टी.एच.दाते – (सहा.आरोग्य अधिकारी) -** प्रभाग क्र. ३२ सॅण्डवीक कॉलनी व प्रभाग क्र. ३४ गव्हाणेवस्ती हगणदारी मुक्त करायचा आहे. अशा प्रकारे आपल्याला प्रत्येक वॉर्ड हगणदारी मुक्त करायचा आहे.

**मा. Adv.नितीन लांडगे –** सुरुवातीला अनाधिकृत झोपडया काढून टाकल्या पाहिजे.

**मा.सुरेखा लांडगे –** माझे प्रभागात खूप वषापूर्वीचे जुने बांधकाम असलेले सार्वजनिक शौचालय आहे त्याची दुरुस्ती करावी लागेल. परंतू दुरुस्ती करायला लागलो तर काही लोक दुरुस्ती करुन देत नाही.

**मा.श्री. रोकडे सी.आर. - आरोग्य निरीक्षक –** काही शौचालयांची बांधकामे पंधरा वीस वर्षापुर्वी केलेली आहेत. सुरुवातीला अंकुशराव लांडगे नाटयगृहासमोरील काम करणे गरजेचे वाटते. ते झालेनंतर वॉर्डचे काम करण्यात येईल.

**मा.अजित गव्हाणे –** ज्या प्रभागात शौचालयासाठी काम करायचे आहे त्याची माहिती पेपरला देणेत यावे. जागा आरक्षीत आहे का पाहिले पाहिजे. बांधकाम विभागाने ठरविलेल्या त्या रस्त्याचे किंवा आरक्षणाचे जागेत आपण बांधकाम करु शकत नाही.

**मा.टी.एच.दाते – (सहा.आरोग्य अधिकारी) –** आपण परफेक्ट जागा असल्या शिवाय बांधकाम करणार नाही. आतापर्यंत ४६६ लोकांना इ क्षेत्रीय कार्यालया मार्फत अनुदान केले आहे. ३७.२८,०००/- इतके केले आहे. ३६ नागरीकांना ८,०००/- प्रमाणे २,८८,०००/- दिले आहे.

**मा.अजित गव्हाणे –** झो.नि.पू.विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांचेशी सबंधीत विषयावर बोलले पाहिजे. ब-याच ठिकाणी जागा उपलब्ध आहे. जागा नसेल तर दुरुस्त करुन घ्या.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** गवळीनगर, संजयगांधीनगर या ठिकाणी १९ एप्रिल रोजी हगणदारी मुक्त प्रबोधनकरीता गेलो होतो. महापालिकेला स्वच्छतेच्या बाबतीत पुरस्कार मिळाल्यानंतर मा.आयुक्त साहेबांनी मिटींग घेतली होती. केंद्र शासनाच्या वेबसाईटवर आहे. प्रशासन चांगल्या प्रकारे प्रयत्न करीत आहे. आपले सर्वांचे सहकार्य मिळावे. आपले माध्यमातुन नागरीकांना माहिती दयावी.

**मा.अजित गव्हाणे –** ब-याच ठिकाणी शौचालय नाही. तसेच ज्या ठिकाणी शौचालय आहे ते वापरले जात नाही. ते वापरले पाहिजे. शौचालय संख्या व लोकसंख्या मॅच होते का हे पाहिले पाहिजे.

**मा.टी.एच.दाते – (सहा.आरोग्य अधिकारी) –** ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे त्या ठिकाणी शौचालय करण्यात येणार आहे.

**मा.अजित गव्हाणे –** या कामकाजा संदर्भात फ्लेक्स लावले पाहिजे. जाहिरात केली पाहिजे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब तसेच संबंधीत वॉर्डमधील नगरसेवकांचे नावाचे फ्लेक्स जागोजागी लावावेत. हे खूप चांगले काम आहे. हॅण्डवील छापावे, जनजागृती करावी. प्रशासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

**मा. सभापती-** यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.